आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२ जानेवारी २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या १० वर्षात देशात रोजगार निर्मितीमध्ये ३६ टक्के वाढ झाल्याचं केंद्रीय कामगार मंत्रालयाचं निवेदन
- तुरुंगात जाती आधारित भेदभाव, वर्गीकरण आणि विलगीकरण होऊ नये यासाठी नवीन नियमावली जाहीर
- केंद्र सरकारनं कश्मिर खोऱ्यातली दहशतवादी परिसंस्थाच उध्वस्त केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, सेन्सेक्स पुन्हा ८० हजारांच्या उंबरठ्यावर, निफ्टी २४ हजारांच्या पलीकडे

**आणि**

- मनु भाकर, डी गुकेश, प्रवीणकुमार आणि हरमनप्रित सिंह यांना मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

गेल्या १० वर्षांमध्ये देशात रोजगार निर्मितीमध्ये ३६ टक्के इतकी लक्षणीय वाढ झाल्याचं केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. २०१४ ते २०२४ या काळात देशात १७ कोटींपेक्षा जास्त अतिरिक्त रोजगार निर्माण झाला, तर गेल्या वर्षभरात ६० लाख रोजगार निर्माण झाल्याचं यात म्हटलं आहे. गेल्या १० वर्षांमध्ये कृषी क्षेत्रातल्या रोजगाराच्या संधींमध्ये १९ टक्के, उत्पादन क्षेत्रात १५ टक्के आणि सेवा क्षेत्रात ३६ टक्के वाढ झाल्याचं या आकडेवारीमधून स्पष्ट होत असल्याचं यात म्हटलं आहे.

देशातला बेरोजगारीचा दर २०१७-१८ मध्ये ६ टक्के होता. २०२३-२४ मध्ये तो कमी होऊन सुमारे सव्वा ३  टक्क्यांवर आला. तर रोजगाराचा दर २०१७-१८ मधल्या  सुमारे ४७ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये ५८ टक्क्यांच्या पलीकडे गेल्याचं यात म्हटलं आहे.

पदवीधर तरुणांची रोजगारक्षमता २०१३ मधल्या सुमारे ३४ टक्क्यांवरून २०२४ मध्ये सुमारे ५५ टक्क्यांपर्यंत गेली. १८ ते २८ वर्ष  वयोगटातल्या ४ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त तरुणांनी ईपीएफओ, अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेत आपली नोंदणी केल्याचं मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्रालयानं तुरुंगांसाठी नवीन दिशानिर्देश जारी केले आहेत. नवीन नियमावलीनुसार आता तुरुंग अधिकाऱ्यांना जाती आधारित भेदभाव, वर्गीकरण आणि विलगीकरण करता येणार नाही.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि राज्यांना कारागृहातला जाती-आधारित भेदभाव दूर करण्यासाठी त्यांच्या कारागृह नियमावली आणि नियमांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवी दिल्ली इथं आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक क्षेत्रातल्या आणि भांडवली बाजारातल्या भागधारकांची बैठक घेतली. अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालची ही सातवी अर्थसंकल्प-पूर्व सल्लामसलत बैठक होती. केंद्रीय अर्थ सचिव, आर्थिक

व्यवहार विभागाचे सचिव आणि मुख्य आर्थिक सल्लागार या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

भटक्या विमुक्तांच्या उत्थानासाठी काम करायला सरकार कटिबद्ध असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं भटक्या आणि विमुक्त जमातींच्या कल्याणाबाबत चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीत बोलत होते. हा समाज मूलभूत सुविधांपासून वंचित राहू नये, यासाठी राज्यांनी केंद्राशी सहकार्य करावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. कागदपत्र नसणं, ही भटक्या आणि विमुक्त समाजाची प्रमुख समस्या असून, त्यामुळे ते केंद्रसरकारच्या योजनांपासून  वंचित राहत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं जम्मू-कश्मीरमधे दहशतवाद केवळ नियंत्रितच केला नाही, तर कश्मिर खोऱ्यातली दहशतवादी परिसंस्थाच उध्वस्त केली आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत जम्मू-कश्मीरवरच्या एका पुस्तकाच्या प्रकाशनानंतर बोलत होते.

**<><><><><>**

जम्मू -काश्मीरला लवकरात लवकर पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज केला. मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पहिल्यांदा पत्रकार परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

डीआरडीओ, अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं आपल्या संशोधन आणि विकासाच्या प्रयत्नांमध्ये स्टार्ट अप्सचा समावेश करण्याच्या शक्यता तपासायला हव्यात, असं आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं डीआरडीओ च्या ६७ व्या स्थापना दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रयत्नांमुळे विचारांच्या देवाणघेवाणीला चालना मिळेल आणि भारतीय संरक्षण क्षेत्राला नवनवीन तंत्रज्ञान उपयोगात आणण्याची संधी मिळेल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नव्या वर्षाच्या दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात आज दमदार तेजी झाली. सकाळी किरकोळ तेजीने सुरू झालेले बाजार नंतर सातत्यानं वाढत गेले. व्यवहारांच्या दरम्यान सेन्सेक्सनं ८० हजारांची पातळीही ओलांडली होती. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ४३६ अंकांची वाढ नोंदवून ७९ हजार ९४४ अंकांवर बंद झाला. सत्रादरम्यान २४ हजार २०० च्या पलीकडे गेलेला निफ्टी दिवसअखेर ४४६ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार १८९ अंकांवर स्थिरावला. डिसेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या वाहन विक्रीमुळं वाहन कंपन्यांचे समभाग तेजीत होते. बँका आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागांना आज जोरदार मागणी होती.

**<><><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकाच्या निश्चितीसाठी २०११ -१२ च्या ऐवजी २०२२-२३ हे वर्ष आधारभूत धरण्यासाठी एका कार्यगटाची स्थापना केंद्रीय वाणिज्य

आणि उद्योग मंत्रालयाने केली आहे. नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद या गटाचे अध्यक्ष असून इतर १८ सदस्य समितीवर आहेत. प्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. सुरजित भल्ला, प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाच्या सदस्य डॉ. शमिका रवी, क्रिसिल या पतमानांकन संस्थेचे मुख्य अर्थतज्ञ डॉ. धर्मकीर्ती जोशी यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

सुफी संत ख्वाजा मोईनुद्दीन हसन चिश्ती यांच्या वार्षिक ऊरुसाला अजमेर इथं आजपासून औपचारिकरित्या सुरुवात झाली. यंदा या ऊरुसाचं ८१३ वं वर्षे असून देशा-परदेशातील भाविक मोठ्या संख्येनं सहभागी होतात.

केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी आज मझहार शरीफवर चादर चढवली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावतीनं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू उद्या मजार शरीफवर चादर अर्पण करणार आहेत.

**<><><><><>**

बांगलादेशी नागरिकांचे भारतात बेकायदेशीर स्थलांतर करणारी एक टोळी दिल्ली पोलिसांनी उघडकीस आणली आहे. पोलिसांनी दोन बांगलादेशी नागरिक आणि त्यांना मदत करणाऱ्या दोन भारतीय नागरिकांना अटक केली असून त्यांच्याकडून बनावट कागदपत्रं जप्त करण्यात आली आहेत. गेल्या महिन्यात १२ बांगलादेशी नागरिकांना परत पाठवण्यात आलं असल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

जपानमध्ये आज सकाळी सायबर हल्ल्यामुळे अनेक वेबसाईटची सेवा खंडित झाली. वेबसाईटच्या प्रणालीमध्ये बिघाड झाल्यामुळे सेवा खंडित झाल्याची माहिती एनटीटी डोकोमो या जपानच्या सर्वात मोठ्या मोबाईल कंपनीनं दिली. जपानमध्ये अलीकडेच झालेल्या अशा प्रकारच्या सायबर हल्ल्यामुळे राष्ट्रीय बँका आणि विमानतळ ऑपरेटरसह, अनेक कंपन्यांची यंत्रणा कोलमडली होती.

**<><><><><>**

ऑलिंपिकमधे दोन पदकं जिंकणारी नेमबाज मनु भाकर, विश्वविजेता बुद्धिबळपटू डी गुकेश, पॅरा ॲथलिट प्रवीणकुमार आणि हॉकीपटू हरमनप्रित सिंह यांना यंदाचा मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळे याला अर्जुन पुरस्कार, तर नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात पॅरा ॲथलिट सचिन खिलारी याचाही समावेश आहे. पॅरा जलतरणपटू मुरलीकांत राजाराम पेटकर आणि ॲथलिट सुचा सिंह यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं आज पुरस्कार विजेत्यांची नावं जाहीर केली. राष्ट्रपती भवनात १७ जानेवारीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांना सन्मानित केलं जाईल.

दरम्यान, पुरस्कार मिळालेल्या खेळाडूंचं उपमुख्यमंत्री तसंच राज्य ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

हॉकी इंडिया लीग स्पर्धेत आज सुरमा हॉकी क्लब संघाचा सामना यूपी रुद्राशी राउरकेला येथील बिरसा मुंडा हॉकी स्टेडियमवर होणार आहे. रात्री सव्वा आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

तत्पूर्वी, श्राची राह बंगाल टायगर्सनं काल रात्री गोनासिका संघाचा २-१ असा पराभव केला. रुपिंदर पाल सिंगनं टायगर्ससाठी दोनदा गोल करून त्यांचा सलग दुसरा विजय मिळवला.